# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


अतितात्काळ/कालमर्यादित

क्रमांक : १०/तंशिसं/पदविका/२०१२/ ४९०
दिनांक : - 6 JUL 2012

प्रति,
सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१२-१३मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, इ. अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसंबंधी शपथपत्र सादर करणेबाबत..

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे सहसंचालक, तंत्रशिक्षण पत्र क्र.१०/ तंशिसं/ पदविका /२०१२/१३३, दि. ७.३.२०१२.
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १०/तंशिसं/पदविका/२०१२/४६३ दि. ३०.६.२०१२

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये सर्व विनाअनुदानित संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होणार किंवा नाही याबाबतचे शपथपत्र संबंधीत विभागीय कार्यालयामध्ये विहित मुदती पर्यत सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शपथपत्र १०० रुपयाच्या स्टॅप पेपरवर संस्थेचे अध्यक्ष/ सचिव आणि संस्थेचे प्राचार्यांची नावानिशी व शिक्क्यासह स्वाक्षरी तसेच नोटरी केलेली असणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आलेले आहे.

तथापी, आपण सादर केलेल्या शपथपत्राचे अवलोकन केले असता आपल्या विहित नमुन्यातील शपथपत्रावर नोटरी केलेली नाही. तरी, आपल्या संस्थेचे नांव या संचालनालयाच्या माहिती पुस्तिकेत प्रसिध्द करण्यात आली असली तरी ऑप्शन फॉर्म भरताना आपल्या संस्थेच्या अभ्यासक्रमाचा चॉईस कोड विद्यार्थ्यांस उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तसेच आपल्या संस्थेस केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेतुन वगळण्यात येईल, यांची संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत:- सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नाशिक/ नागपूर/ पुणे यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी आपल्या अधिपत्याखालील संस्थेबाबत वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

अतितात्काळ/कालमर्यादित

सहसंचालक तंत्रशिक्षण वि. कार्यालय अमरावती
जा.क्र. विकाअ/शिक्षण/पदविका/ ९५५९
दिनांक २९/०६/२०१२

प्रति,
१) प्राचार्य, सुधाकरराव नाईक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पुसद
२) प्राचार्य, श्री. रामरावजी गावंडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोलखेड, अकोला.
३) प्राचार्य, विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, वाशिम.

उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रक्रीया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीस्तव अग्रेषित.